# उत्तरपत्रिका

## विभाग – १ : गद्य

**प्रश्न १. (अ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) कोण ते लिहा.** **[०२]**

**(i) आय. आय. टी., कानपूरचा विद्यार्थी** – सुमित

**(ii) स्वच्छतेची आवड असलेली** – स्नेहल

*** (उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) आकृतिबंध पूर्ण करा.** **[०२]**

**रेखामावशीच्या पायांना धूळ लागण्याची कारणे**

- शेणामातीत काम केल्याने
- वस्तीतला रस्ता उखणलेला असल्यामुळे

**(३) स्वमत.** **[०३]**

**'तापानं फणफणलीय आपली धरती' ही स्थिती बदलण्यासाठी उपाय सुचवा.**

**उत्तर:** 'तापानं फणफणलीय आपली धरती' याचा अर्थ धरतीवरील प्रदूषणामुळे पृथ्वीवरचे वातावरण तापले आहे. यामुळे सजीव सृष्टी धोक्यात आली आहे. ही स्थिती बदलण्यासाठी पर्यावरणाचे रक्षण करणे हे फार महत्त्वाचे आहे.

वृक्षारोपण व त्यांचे संगोपन केले पाहिजे. वातावरणातील कार्बनच्या वाढत्या प्रमाणाला आळा घालण्यासाठी वायु प्रदूषण टाळले पाहिजे. डिजेल व पेट्रोलवर चालणारी वाहने यांचा वापर बंद करून इलेक्ट्रिक वाहनांचा तसेच सायकलचा वापर केला पाहिजे. सार्वजनिक वाहतूक साधने म्हणजे बस, ट्रेन यांचा वापर केल्याने प्रवास खर्च, इंधन यांची बचत होऊन प्रदूषणही टाळता येईल. ग्लोबल वार्मिंगमुळे होणारे धोके टाळण्यासाठी माणसाने प्रदूषणावर नियंत्रण मिळवले पाहिजे.

दूषित पाणी, हवा यामुळे पर्यावरणाचे नुकसान होते. ते दूर करणे व पृथ्वीचे रक्षण करणे हे आपल्या हाती आहे.

**प्रश्न १. (आ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) चौकटी पूर्ण करा.** **[०२]**

**(i) वाघिणीच्या पिल्लांचे वय** – पाच महिन्यांची

**(ii) वाघिणीला अवगत असलेली कला** – सतत कोणती-कोणती शिकार करण्याची कला.

✻ **(उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) कृती करा.** **[०२]**

**वाघिणीच्या पिल्लांचे खेळ**

- एकमेकांचा पाठलाग करणे.
- पाण्यात उड्या घेणे.

**(३) स्वमत.** **[०३]**

**'लेखकाला वाघिणीतील आईची झलक जाणवली', हे विधान पाठाच्या आधारे स्पष्ट करा.**

**उत्तर:** लेखक जंगलामध्ये निरीक्षणासाठी गेले होते. जंगलात त्यांनी एक वाघीण स्वच्छंद विहार करताना जाणवली. ती आपल्या बछड्यांसह बागडत होती. लेखकाला त्या वाघिणीत आईची झलक जाणवली.

'आई' या शब्दातच प्रेम व वात्सल्य दिसून येते. मग तो मनुष्य असो व प्राणी. प्रत्येक आई आपल्या मुलाची जिवापलीकडे काळजी घेत असते. म्हणूनच शिकारीसाठी जाताना वाघीण आपल्या पिल्लांना दाट झुडपात लपवून ठेवत असे. पिल्लांच्या उधाणाने आईच्या उत्साहाला उधाण येत असे. त्यांच्याबरोबर खेळणे, पिल्लांना इशारा देणे, त्यांनी मस्ती केली तरी गप्प बसून सहन करणे, त्यांचे संरक्षण करणे, पोट भरणे या सर्व गोष्टींतून वाघिणीतील आईपण जाणवते.

## अपठित गद्य

**प्रश्न १. (इ) उताऱ्याच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) कारणे लिहा.** **[०२]**

**(i) माणसाला श्रेष्ठ कलाकृतींचा आस्वाद घेता आला पाहिजे, कारण.......**


**उत्तर:** श्रेष्ठ कलाकृतींमध्ये जीवन फुलवण्याची अमर्याद शक्ती असते.

**(ii) एखादा माणूस साक्षर असूनदेखील सुसंस्कृत नसतो, कारण.......**

**उत्तर:** जीवनातील आनंद कसा लुटावा हे त्याला ठाऊक नसते.

***** **(उतारा कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) आकृतिबंध पूर्ण करा.** **[०२]**




## विभाग – २ : पद्य

**प्रश्न २. (अ) कवितेच्या आधारे सूचनेनुसार कृती करा.**

**(१) कोण ते लिहा.** **[०२]**

**(i) चंद्रकिरण पिऊन जगणारा पक्षी** – चकोर

**(ii) व्यक्तीला सदैव सुख देणारा** – योगी पुरुष

***** **(कविता कृतिपत्रिकेत पाहा.)**

**(२) खालील तक्ता पूर्ण करा.** **[०२]**

**योगी पुरुष आणि पाणी यांतील फरक स्पष्ट करा.**

**उत्तर:**

| | **योगी पुरुष** | | **पाणी** |
|---|---|---|---|
| (i) | योगी पुरुष हा आपल्याला सबाह्य निर्मळ करतो. | (i) | पाणी वरवरचा मळ स्वच्छ करते. |
| (ii) | योगी पुरुष सर्व इंद्रियांना शांत करतो. | (ii) | पाणी फक्त जिभेला तृप्त करते. |

**(३) प्रस्तुत कवितेतील शब्दांचा अर्थ लिहा.** **[०२]**

**उत्तर: (i) पांखोवा** – पंख **(ii) उदक** – पाणी

**(iii) तृषित** – तहानलेला **(iv) क्षाळणे** – धुणे

**(४) काव्यसौंदर्य.** **[०२]**

**योगी पुरुष आणि पाणी हे दोघेही सामाजिक कार्य करतात, हे स्पष्ट करा.**

**उत्तर:** संत एकनाथांनी योगी पुरुष आणि पाणी यांची तुलना करून योगी पुरुष हा पाण्यापेक्षा श्रेष्ठ असतो हे सांगितले आहे. दोघेही समाजासाठी निस्वार्थ भावनेने झटतात हे सुद्धा स्पष्ट केले आहे.

योगी पुरुष हा आपल्या आत्मज्ञानाने पृथ्वीवर चैतन्य आणतो. आपल्या श्रवण कीर्तनाने पृथ्वीवरील जनमाणसात सदा सर्वकाळ सुख देतो. योगी पुरुषाने दिलेला ज्ञानरूपी गोडवा सर्व इंद्रियांना शांत करतो. योगी पुरुषाच्या बोलण्याने, त्यांचे बोलणे ऐकल्याने समाजाचा उद्धार होतो.

पाण्यामुळे सजीव सृष्टी जीवित आहे. यामुळे पाणी हे जीवनदायी आहे. पाण्यामुळे माणसाला अन्न-धान्य मिळते. सर्व मनुष्य व पशु-पक्षी, जनावरे यांची तहान भूक भागवण्याचे कार्य पाणी करते. पाण्यामुळेच निसर्ग व मानवी जीवन आहे. हे सामाजिक कार्य आहे.

अशा प्रकारे योगी पुरुष आणि पाणी हे दोघेही सामाजिक कार्य करतात.

**प्रश्न २. (आ) खालील दोन कवितांपैकी कोणत्याही एका कवितेसंबंधी दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे कृती सोडवा.**

**'अंकिला मी दास तुझा' किंवा 'स्वप्न करू साकार'**

**'अंकिला मी दास तुझा'**

**(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री.** **[०१]**

**उत्तर:** संत नामदेव

**(२) प्रस्तुत कवितेचा विषय.** **[०१]**

**उत्तर:** आई, प्राणी, पक्षी यांच्या विविध दृष्टांतातून परमेश्वर आपल्या भक्तांवर आईप्रमाणे प्रेम करतो हे सांगून खरी भक्ती स्पष्ट केली आहे.

**(३) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा.** **[०२]**

**नामा म्हणे मेघा जैसा ।**
**विनवितो चातक तैसा ।।**

**उत्तर:** संत नामदेव हे विठ्ठलाला म्हणतात, तू कृपारूपी पाण्याने भरलेला ढग आहे. तुझ्या कृपेचा वर्षाव माझ्यावर होऊ देत. चातक पक्षी पावसाच्या पाण्याची वाट पाहत असतो तशी मी तुझ्या मायेच्या व कृपेच्या वर्षावाची वाट पाहत आहे.

**(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण.** **[०२]**

**उत्तर:** 'अंकिला मी दास तुझा' या अभंगातून अनेक सहज सोपी उदाहरणे दिली आहेत. यातून मला भक्ती करण्याचा मार्ग मिळाला. भाषा सोपी व सरळ असल्याने अभंगाचा अर्थ समजतो, परमार्थाचा मार्ग समजतो. म्हणून प्रस्तुत अभंग आवडला.

**(५) प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा.** **[०२]**

**उत्तर:** **(i) कनवाळू** – दयाळू **(ii) काज** – काम, कार्य

**(iii) सवें** – लगेच **(iv) पाडस** – हरिणीचे पिल्लू

**किंवा**

**'स्वप्न करू साकार'**

**(१) प्रस्तुत कवितेचे कवी/कवयित्री.** **[०१]**

**उत्तर:** किशोर पाठक

**(२) प्रस्तुत कवितेचा विषय.** **[०१]**

**उत्तर:** देशाच्या उज्ज्वल भविष्याचे वर्णन करून देशाची प्रतिष्ठा राखण्याचे आवाहन या कवितेत केले आहे.

**(३) प्रस्तुत ओळींचा सरळ अर्थ लिहा.** **[०२]**

**हजार आम्ही एकी बळकट ।**
**सर्वांचे हो एकच मनगट ।।**

**उत्तर:** भारतीय हजारो–लाखोंच्या संख्येने असलो तरी आमच्यात फार मोठी एकी आहे. ही एकी आमची मजबूत ताकद आहे. आमच्या मनगटात असलेल्या ताकदीने देश बलशाली व मजबूत बनवू असा आत्मविश्वास व्यक्त केला आहे.

**(४) प्रस्तुत कविता आवडण्याचे वा न आवडण्याचे कारण.** **[०२]**

**उत्तर:** प्रस्तुत कविता मला आवडली, कारण देशाच्या उज्ज्वल भविष्याचे स्वप्न रेखाटले आहे. तसेच नैतिक मूल्य जोपासून देशप्रेमही व्यक्त केले आहे.

**(५) प्रस्तुत शब्दांचा अर्थ लिहा.** **[०२]**

**उत्तर:** **(i) विभव** – वैभव **(ii) हस्त** – हात

**(iii) श्रम** – कष्ट **(iv) तन** – शरीर

## विभाग – ३ : स्थूलवाचन

**प्रश्न ३. खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[०६]**

**(१) टीप लिहा – व्युत्पत्ती कोशाचे कार्य.**

**उत्तर:** एखाद्या शब्दाबद्दलचे कुतूहल व त्याच्या निर्मितीच्या अर्थाचे मूळ ज्ञान पाहण्यासाठी आपण व्युत्पत्ती कोशाची मदत घेतो.

व्युत्पत्ती कोशामध्ये मूळ शब्द केव्हा, कुठे, कसा निर्माण झाला ते समजते.

व्युत्पत्ती कोशाचे कार्य पुढीलप्रमाणे चार प्रकारे चालते.

(i) शब्दाचे मूळ शब्दरूप दाखवणे. प्रमाण भाषा व बोली भाषा – रूप व अर्थ दर्शविणे.

(ii) भाषेतील उच्चारातील बदल व फरक दाखवणे.

(iii) शब्दांचे अर्थ भिन्न काळात व इतिहासाच्या दृष्टीने बदलतात. या बदलांचा फरक स्पष्ट करणे.

(iv) शब्दांचे अर्थ भिन्न–भिन्न समाजात वेगवेगळ्या कारणांनी, अर्थाच्या अनुषंगाने बदलतात, ते स्पष्ट करणे.

**(२) पणतीच्या उदाहरणातून 'जाता अस्ताला' या कवितेत व्यक्त झालेला विचार स्पष्ट करा.**

**उत्तर:** 'जाता अस्ताला' हे रवींद्रनाथ टागोर यांच्या बंगाली कवितेचे मराठीतील रूपांतर आहे. याचे श्यामला कुलकर्णी यांनी मराठीत स्वैर रूपांतर करून पणतीच्या प्रतिकातून अगदी छोट्या जीवालाही जगाला काही तरी देण्याची, जग सुंदर करण्याची क्षमता असते हे सांगितले आहे. सूर्य दिवसभर पृथ्वीला प्रकाश देतो, ऊर्जा देतो, पण माझ्या अस्तानंतर पृथ्वीला प्रकाश कोण देणार? या विचाराने अस्वस्थ होतो. त्यावेळी छोटी पणती पुढे येते आणि म्हणते की, मला जमेल तशी मी पृथ्वीला उजळत ठेवीन. पणतीच्या या उदाहरणातून प्रत्येकाने आपल्या क्षमतेप्रमाणे सत्कार्य करावे असा संदेश मिळतो. अंधारात प्रकाश देणारी पणती सेवाभाव करताना लहान, मोठे असे कोणी नसते असा मोलाचा संदेश देते.

**(३) 'आधी केले मग सांगितले', या उक्तीची यथार्थता 'मोठे होत असलेल्या मुलांनो......' या पाठाच्या आधारे स्पष्ट करा.**

**उत्तर:** लेखकाने भाभा अणुसंशोधन क्षेत्रात ट्रेनिंग पूर्ण केल्यावर त्यांना इंजिनियर म्हणून सेवेत घेतले गेले. त्यांना मेटलायझिंग प्रक्रियेवर काम करण्यासाठी सांगण्यात आले. त्यासाठी त्यांना वेल्डर, फोरमनची आवश्यकता होती. त्यांना ती मदत मिळाली नाही. पुढे जिद्दीने त्यांनी ते काम एकट्याने पूर्ण केले. त्यानंतर त्यांना देण्यात

आलेली मदत त्यांनी नाकारली. ते एक गोष्ट शिकले. आपण स्वतः काय करू शकतो ते बघावे, मग ते काम इतरांना सांगावे, कारण आपल्याला येत नसताना दुसऱ्यांना काम सांगणे चूक आहे.

## विभाग – ४ : भाषाभ्यास

**प्रश्न ४. (अ) व्याकरण घटकांवर आधारित कृती.**

**(१) खालील वाक्यांचा प्रकार ओळखा.** **[०२]**

**(i) पांढरा रंग कोणाला आवडत नाही?**

**उत्तर:** प्रश्नार्थक वाक्य

**(ii) किती सुंदर आहे ही बाग!**

**उत्तर:** उद्गारार्थी वाक्य

**(२) कंसातील सूचनेनुसार वाक्य रूपांतर करा.** **[०२]**

**(i) तू आता लहान राहिला नाहीस. (होकारार्थी करा.)**

**उत्तर:** तू आता मोठा झाला आहेस.

**(ii) दररोज अभ्यास कर. (विधानार्थी करा.)**

**उत्तर:** दररोज अभ्यास करावा.

**(३) खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगून वाक्यात उपयोग करा (कोणतेही दोन).** **[०४]**

**(i) अंगाचा तिळपापड होणे – खूप राग येणे.**

**उत्तर:** मी खोटे बोलल्यामुळे आईच्या अंगाचा तिळपापड झाला.

**(ii) तथ्य असणे – सत्यता असणे.**

**उत्तर:** विज्ञानाच्या नियमांत तथ्य असते.

**(iii) ऋण असणे – कर्ज असणे.**

**उत्तर:** शेतकऱ्यावर सावकाराचे शेतीसाठी काढलेले पन्नास हजाराचे ऋण अद्याप होते.

**प्रश्न ४. (आ) भाषिक घटकांवर आधारित कृती.**

**(१) शब्दसंपत्ती.**

**(१) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा.** **[०१]**

**उत्तर:** (i) घर – सदन (ii) आई – माता

**(२) खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.** **[०१]**

**उत्तर:** (i) सोपे × कठीण (ii) दिवस × रात्र

**(३) शब्दसमूहाबद्दल एक शब्द लिहा.** **[०१]**

**उत्तर:** कविता करणारा – कवी

**(४) खालील शब्दांचे लिंग बदला.** **[०१]**

**उत्तर:** (i) शिक्षक – शिक्षिका (ii) विद्यार्थी – विद्यार्थिनी

**(२) लेखननियमांनुसार लेखन.**

**खालील वाक्ये लेखननियमांनुसार लिहा.** **[०२]**

**(i) अशा परिस्थीतीत माझी शाळा सूरू झाली.**

**उत्तर:** अशा परिस्थितीत माझी शाळा सुरू झाली.

**(ii) पूलाच्या जवळपास भीक्षेकरी म्हातारा दिसला.**

**उत्तर:** पुलाच्या जवळपास भिक्षेकरी म्हातारा दिसला.

**(३) विरामचिन्हे.**

**खालील विरामचिन्हांची नावे लिहा.** **[०२]**

**उत्तर:** (i) , – स्वल्पविराम (ii) . – पूर्णविराम

(iii) ! – उद्गारवाचक चिन्ह (iv) ? – प्रश्नार्थक चिन्ह

## विभाग – ५ : उपयोजित लेखन

**प्रश्न ५. (अ) खालील कृती सोडवा.**

**(१) पत्रलेखन.**

**खालील निवेदन वाचा व त्याखालील कोणतीही एक कृती सोडवा.** **[०६]**

* **(प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

दिनांक: ०९ ऑक्टोबर,२०२२.

प्रति,

माननीय व्यवस्थापक,

ज्ञानप्रकाश वाचनालय,

सोमवार पेठ,

धुळे – ४२४००१.

**विषय:** ‘वाचन कार्यशाळेत’ सहभागी करून घेण्याबाबत.

माननीय महोदय,

सप्रेम नमस्कार,

मी समीर घाटे सन्मित्र विद्यालय, धुळे येथील शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी आहे. ज्ञानप्रकाश वाचनालयामार्फत विद्यार्थ्यांसाठी भाषिक कौशल्यांचा विकास करणारी 'वाचन कार्यशाळा' आपण आयोजित केली आहे असे समजले.

श्रीमती वीणा सप्रे या कार्यशाळेला विशेष मार्गदर्शन करणार आहेत हे वाचून खूप आनंद झाला. ०१ नोव्हेंबर ते १० नोव्हेंबर या काळात चालणाऱ्या 'वाचन कार्यशाळा' या कार्यक्रमात आमच्या सन्मित्र विद्यालयाच्या दहा विद्यार्थ्यांना या उपक्रमात सहभागी व्हायचे आहे.

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आपल्या वाचन कार्यशाळेचा लाभ आमच्या सारख्या विद्यार्थ्यांना नक्कीच होईल! म्हणून आम्हां विद्यार्थ्यांना आपल्या कार्यशाळेत सहभागी करून घ्यावे ही नम्र विनंती.

dpv.70@gmail.com या इमेलवर मी दहा विद्यार्थ्यांची संपूर्ण माहिती पाठवली आहे.

महोदयांनी आमच्या विनंती अर्जाचा विचार करून आम्हाला उपकृत करावे ही नम्र विनंती.

आपला नम्र,
कुमार समीर घाटे,
(विद्यार्थी प्रतिनिधी)
सन्मित्र विद्यालय,
धुळे - ४२४००१.

ई-मेल आयडी - abc.@gmail.com

**(किंवा)**

**उत्तरः**

दिनांकः १२ नोव्हेंबर, २०२२

प्रति,

माननीय व्यवस्थापक,

ज्ञानप्रकाश वाचनालय,

सोमवार पेठ,

धुळे - ४२४००१.

माननीय व्यवस्थापक,

सप्रेम नमस्कार,

विद्यार्थ्यांच्या भाषिक कौशल्यांचा विकास करण्यासाठी आपण 'ज्ञानप्रकाश वाचनालया' मार्फत वाचन कार्यशाळांचे उत्कृष्ट आयोजन केल्याबद्दल हार्दिक अभिनंदन!

विद्यार्थ्यांचा भाषिक विकास, तसेच सर्वांगीण विकासासाठी वाचन कार्यशाळा उपयुक्त ठरली आहे. कार्यक्रमाचे विशेष मार्गदर्शन करणाऱ्या श्रीमती वीणा सत्रे यांनी विद्यार्थ्यांशी साधलेला संवाद व दिलेली व्यावहारिक उपयुक्त माहिती उत्कृष्ट होती.

वातानुकुलीन सभागृह, उत्तम आसन व्यवस्था, भोजन व जलपान व्यवस्था याचे नियोजन बघण्यासारखे होते. आपल्या या उपक्रमास आमच्याकडून शुभेच्छा आणि उत्कृष्ट आयोजनाबद्दल पुनश्च अभिनंदन!

आपला नम्र,

कुमार समीर घाटे,

(विद्यार्थी प्रतिनिधी)

सन्मित्र विद्यालय,

धुळे - ४२४००१.

ई-मेल आयडी - abc.@gmail.com

**(किंवा)**

**(२) सारांश लेखन.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तरः** 'कला आस्वाद' ही मानवी जीवन फुलवण्याची अमर्याद शक्ती आहे. साहित्य, संगीत, नाट्य, चित्र यासारख्या कलातून मानवी जीवन सुसंस्कृत बनते. जीवनाचा आनंद कलेतून मिळतो व जीवन सुखी बनते.

**प्रश्न ५. (आ) खालीलपैकी कोणत्याही दोन कृती सोडवा.** **[१०]**

**(१) जाहिरात लेखन.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

**फॅशन हाऊस क्लॉथ सेंटर**

**५० वर्षांची परंपरा**

***वैशिष्ट्ये***

- सर्व शाळांचे गणवेश उपलब्ध
- विद्यार्थ्यांचे माप घेऊन दुसऱ्याच दिवशी गणवेश घरपोच
- उत्तम शिलाई, उत्तम कापड
- रंग गेल्यास पैसे परत
- शाळेची टाय गणवेशासोबत मोफत

**खरेदीवर २५% सूट**

**संपर्क साधा :** प्रो. विजय महाजन

**क्रमांक :** ९८१९७२४७८१
९८६९४६६६६९

**वेळ :** सकाळी ९.०० ते रात्री ९.००

**❊ आजच खरेदी करा ❊**

**फॅशन हाऊस क्लॉथ सेंटर, डी.एन.नगर, सहकार रोड, अंधेरी (प.), मुंबई – ४०००५८**
**ई - मेल आयडी – vtmahajan@gmail.com**

**(२) बातमीलेखन.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:**

**'वाचन प्रेरणा दिन'**

आमच्या वार्ताहराकडून, दि. १६ ऑक्टोबर

अभिनव विद्यालय, औरंगाबाद येथील शाळेत भारतरत्न ए.पी.जे. अब्दुल कलाम आझाद यांचा जन्मदिवस 'वाचन प्रेरणा दिन' म्हणून मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. शाळेच्या मुख्याध्यापिका श्रीमती सुचिता जगताप यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व समजावून सांगितले. संगणक व मोबाईलच्या दुनियेतही पुस्तकाचे महत्त्व कमी झाले नाही. वाचन संस्कृती शिक्षक व विद्यार्थ्यांनी जपली पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी केले.

शालेय विद्यार्थी विजय महाजन याने थोर वैज्ञानिक ए.पी.जे. अब्दुल कलाम यांच्या कार्याची ओळख भाषणातून करून दिली. मराठी विषय शिक्षक प्रकाश पांचाल यांनी विद्यार्थ्यांना वर्गात विशेष वाचन तास घेऊन अवांतर वाचनाचे महत्त्व पटवून दिले. वाचन प्रेरणा दिन म्हणून केवळ वाचन न करता एक चांगली सवय म्हणून वाचायला पाहिजे. आजच्या जीवनात जो 'वाचेल तो वाचेल' या उक्तीचा परिचय विद्यार्थ्यांना करून दिला.

शिक्षण विभागातर्फे सुरू करण्यात आलेला हा 'वाचन प्रेरणा दिन' विद्यार्थ्यांसह शिक्षक वर्गाने मोठ्या उत्साहाने साजरा केला.

## (३) कथालेखन.

*** (मुद्दे कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** **जादूची काठी**

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे. हंसराजपूर नावाचे एक छोटे राज्य होते. या राज्याचा राजा धर्मपाल होता. एक दिवस तो आपला प्रधान अमरेशसह शिकारीला जंगलात जातो. रात्र झाल्याने तो त्या दिवशी जंगलातून रात्री आपल्या राजदरबारात पोहचू शकला नाही. दुसऱ्या दिवशी सकाळी तो आपल्या राजदरबारात पोहचतो.

राजाच्या महालातील दिवाणखान्यातील सामान इतरत्र पसरलेले राजाला दिसते. पाहतो तर काय? राजाची मौल्यवान अंगठी चोरीला गेलेली असते. राजाला सेवकांवर संशय येतो. राजा ही गोष्ट तात्काळ आपला प्रधान अमरेशला सांगतो. त्या दिवशी दरबारात सहा-सात सेवक रात्रीच्या वेळेस बंदोबस्तासाठी हजर होते. राजाच्या हुशार प्रधानाने एक युक्ती केली.

प्रधानाने सर्व सेवकांना एकत्र बोलावले आणि सर्वांना समान लांबीच्या काठ्या दिल्या. सेवकांना सांगितले या जादूच्या काठ्या आहेत. ज्या सेवकाने राजदरबारात चोरी केली आहे त्या चोर सेवकाची काठी दुसऱ्या दिवशी दोन इंच वाढणार आहे. तुम्ही उद्या सकाळी अकरा वाजता राजदरबारात आपल्या काठ्यांसह हजर रहा.

सेवक काठी घेऊन आपआपल्या घरी गेले. जो चोर होता त्याला रात्रभर झोप आली नाही. पहाट होताच त्यांनी आपली काठी दोन इंच कापली. दुसऱ्या दिवशी अकरा वाजता सर्व सेवक राजदरबारात हजर झाले. सर्वांनी आपल्या काठ्या प्रधानाकडे दिल्या. चोरी केलेल्या सेवकाची काठी दोन इंच कमी झालेली होती. राजाला खरा चोर सापडला. त्याला अटक करून कोठडीत टाकण्यात आले. अशा प्रकारे प्रधानाच्या हुशारीने खऱ्या चोराला शिक्षा झाली.

**तात्पर्य:** वाईट कर्माचे फळ नेहमीच वाईट होते म्हणून सत्याने वागावे. चोरी कधी करू नये.

**प्रश्न ५. (इ) लेखनकौशल्य.**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. [०८]**

**(१) प्रसंगलेखन.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** **रांगोळी प्रदर्शन**

दिवाळीचे दिवस होते. सगळीकडे दिव्यांचा झगमगाट व रोषणाई होती. आमच्या अंधेरीच्या टिळक मंदिर सभागृहात अशाच प्रकारची रोषणाई केली होती व प्रवेशद्वारावर लिहिले होते, 'भव्य रांगोळी प्रदर्शन'. म्हणून मी सभागृहात गेलो.

नावाप्रमाणेच भव्य असे रांगोळी प्रदर्शन भरले होते. उत्सवानिमित्त सामाजिक व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देणारे रांगोळी प्रदर्शन होते. राजहंस विद्यालयाचे मुख्याध्यापक गोविंद राजन श्रीनिवास यांच्या हस्ते या रांगोळी प्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले होते.

विविधरंगी कलात्मक रांगोळ्यांनी दालन सजलेले होते. थोर महापुरुषांची चित्रे, निसर्ग चित्रे, तसेच पोलिसांची व सैनिकांची कर्तव्यावर असलेली भावनात्मक चित्र रांगोळीतून कलाकारांनी साकारली होती. आपल्या कुंचल्यातून रांगोळीमध्ये जीवंतपणा भरला होता. काही रांगोळ्या इतक्या सुंदर होत्या की ती रांगोळी आहे की, फोटो फ्रेम आहे की, सुंदर चित्र आहे? असा प्रश्न बघणाऱ्यांना वाटे. तब्बल पन्नास स्पर्धकांनी या रांगोळी स्पर्धेत भाग घेतला होता.

उत्कृष्ट रंगसंगती; भावना रांगोळीतून व्यक्त होत होती. दोन तास रांगोळी प्रदर्शन बघून सुद्धा तेथून पाय निघत नव्हते. दिवाळीचा आनंद द्विगुणीत करणारे हे रांगोळी प्रदर्शन आबाल वृद्धांच्या चर्चेचा विषय ठरला होता. अत्यंत कष्टाने उभारलेली ही रांगोळी क्षणात नष्ट होणार होती. परंतु डोळ्यात साठवलेली व हृदयात कोरलेली ही रांगोळी मात्र मनात अजरामर होणार होती. प्रवेशद्वारातून बाहेर पडताना मनात भावलेल्या तीन रांगोळ्यांना प्रेक्षकांनी आपली मते द्यायची होती. शेवटी परीक्षकच अंतिम निर्णय देऊन सर्वोत्कृष्ट तीन रांगोळ्यांना पारितोषिके देणार होते. पण माझ्या मते पन्नासच्या पन्नास रांगोळ्या माझ्या नजरेत कोरल्या होत्या.

**(२) आत्मकथन.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** **वर्गातील फळा**

**फळ्याचे आत्मवृत्त**

''मुलांनो! शांत बसा शिक्षक वर्गात येतील. माझा आवाज ऐकून तुम्ही घाबरलात नाही ना!''

अरे, मी तुमच्या वर्गातील फळा बोलतो आहे. माझे तुमच्या शाळेतील स्थान

फार महत्त्वाचे आहे. शाळेतील शिक्षक नव्हे तर विद्यार्थ्यांसाठीही मी फार महत्त्वपूर्ण आहे.

माझे जन्मस्थळ जंगलात आहे. एका झाडाच्या लाकडांपासून फळ्या केल्या. फळ्यांपासून चौकोन बनवून फळा तयार केला. माझ्यावर काळा रंग दिला. शाळेच्या मुख्याध्यापकांनी प्रत्येक वर्गात माझी स्थापना केली. मी नवीन असल्याने सर्वजण माझ्याकडे प्रेमाने पाहत होते. शिक्षक, विद्यार्थी यांचा मी एक साथी आहे. विद्यार्थी माझ्यावर सुविचार लिहितात. रोजची उपस्थिती, गैरहजेरी मी दाखवतो.

गणिताचे शिक्षक अवघड गणित तुम्हाला शिकवताना माझा वापर करतात व तुम्हाला गणित सोपे जाते. चित्रकला शिक्षक माझ्यावर सुंदर चित्रे काढतात. निबंध लेखन, कथालेखन, जाहिरात लेखन या सर्व प्रकारांसाठी, व्याकरणासाठी तर भाषा शिक्षक माझाच वापर करतात. मुलेही प्रश्नोत्तरे व आकृत्यांचे सराव करण्यासाठी माझ्याकडे येतात.

फळा काळानुसार बदलत गेला. लाकडी रूप जाऊन सरळ भिंतीच फळ्याचे रूप घेऊ लागल्या. कपड्याचे, प्लॅस्टिकचे, धातूचे फळे तयार झाले. हल्ली माझा वापर कमी होऊ लागला आहे. तयार नोट्स, इ-मेल, फॅक्स, व्हॅट्सॲप यामुळे माझे हाल होऊ लागले. मी अडचणीत सापडलो आहे. मुले स्मार्ट झाली त्याचबरोबर फळाही स्मार्ट झाला. माझी जागा आता स्मार्ट बोर्डने घेतली आहे. माझे रंग-रूप बदलले पण उपयोग मात्र तोच आहे.

‘‘मी ‘फळा’ तुमचा आरसा आहे. मला स्वच्छ ठेवा. नियमित वापरा. मी तुमच्या स्मरणात राहीन. कारण मी तुमच्या मनातलं बोलतो. मला चांगल्या प्रकारे वापरा फायदा तुमचा आहे. मला तुमचा मित्र समजा.’’

**(३) वैचारिक.**

*** (प्रश्न कृतिपत्रिकेत पाहा.)**

**उत्तर:** **‘झाडे लावा, पृथ्वी वाचवा’**

सध्याच्या आधुनिक व तंत्रज्ञानाच्या, डिजिटल दुनियेत आपण निसर्गाला पारखे होत चालले आहोत. निसर्गातील महत्त्वाचा घटक म्हणजे वृक्षवल्ली व हिरवीगार झाडे.

झाडांमुळेच मानवाला जीवंत राहण्यासाठी ऑक्सिजन मिळतो. थंड हवा, भरपूर पाऊस, रंगबेरंगी फुले, चवदार फळे, रबर, लाकूड, वनस्पती, औषधे मिळतात. पशु-पक्ष्यांचे, प्राण्यांचे निवासस्थान म्हणजे झाडच! पण दुर्दैवाने रस्त्यांचे रुंदीकरण, इमारती बांधण्यासाठी व स्वतःच्या फायद्यासाठी सिमेंटचे जंगल बनवताना माणसाने बेसुमार झाडाची कत्तल केली. यामुळेच पर्यावरणाचा समतोल बिघडला. वृक्षतोडीमुळे

जमिनीची धूप झाली; वातावरणातील प्राणवायूचे प्रमाण कमी झाले. पृथ्वीवरील उष्णतेचे प्रमाण वाढले आणि पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे मानवाचाही ऱ्हास झाला.

निसर्गाचा आस्वाद घेण्यासाठी माणसांना शहर सोडावे लागते ही दुर्देवाची गोष्ट आहे. शहरांमध्ये श्वसनाचे व हृदयाचे आजार बळावले आहेत. विकासाच्या नावाखाली, मेट्रोच्या प्रकल्पासाठी जगभरात जंगलतोड केली जात आहे. जंगले ओस पडली आहेत. औषधीयुक्त वनस्पती मिळणे दुर्मिळ झाले आहे. वेळी-अवेळी पाऊस पडत आहे. पाण्याचे दुर्भिक्ष्य वाढले आहे. जंगल संपत्ती नष्ट झाल्याने प्राणी जीवन संपुष्टात आले आहे. दरवर्षी २१ मार्च हा दिवस जागतिक वन दिन म्हणून साजरा केला जातो. शास्त्रीय दृष्ट्या ३३ टक्के जमीन वनाखाली असणे आवश्यक आहे. यामुळेच आज वृक्ष संवर्धन व वृक्षारोपणाची गरज आहे.

वृक्षांच्या सान्निध्यात राहायला कुणाला आवडत नाही? माणसाच्या जीवनात वृक्षाचे महत्त्व वेगळेच आहे. प्राचीन काळापासून निसर्ग हा परमेश्वर मानला आहे. मी निसर्गाचा एक घटक आहे.

वेदांतात, रामायणात, महाभारतात वृक्षांचा उल्लेख आहे. देव, संत यांनीही वृक्षाला जीवनात फार महत्त्व दिले होते. म्हणूनच मानवाच्या संरक्षणासाठी, हितासाठी वृक्षांचे रक्षण केले पाहिजे. वृक्ष जगले तर मानव जगेल, प्राणीमात्र श्वास घेईल. सजीवसृष्टी आनंदी राहील. म्हणूनच पर्यावरणाच्या रक्षणासाठी आणि मानवाच्या सुखी-आनंदी जीवनासाठी वृक्षतोड थांबवा. झाडे लावा आणि पृथ्वी वाचवा.

★★★